दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१० डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १०८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 9 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 108 | Pages 4 | Rate 4 Rs

# उद्धव ठाकरेंचे १३ आमदार माझ्या संपर्कात मंत्री संजय शिरसाट यांचा मोठा दावा

## आमदार ठाकरेंच्या कार्यपद्धतीला कंटाळल्याचे सूतोवाच

### शिंदेसेना आमचा मित्रपक्ष, त्यांचे आमदारही आमचेच-फडणवीस

दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदेंचे २० आमदार भाजपच्या गळाला लागल्याचा आदित्य ठाकरे यांचा दावा जोरकसपणे फेटाळून लावला आहे. आदित्य ठाकरेंच्या म्हणण्यात कोणतेही तथ्य नाही. उद्या कुणी असेही म्हणेल की, आदित्य ठाकरेंचे २० आमदार भाजपच्या गळाला लागलेत. असे उगीच काहीतरी म्हटल्याने काहीही होत नाही. आम्हाला शिंदेसेनेचे आमदार घेऊन काय करायचे आहे? ते आमचेच आहेत. शिंदेसेना आमचा मित्रपक्ष आहे. ती खरी शिवसेना आहे. त्यामुळे मित्रपक्षांना पक्षात घेण्याचे कारण नाही. आम्ही तसे राजकारण करत नाही. उलट शिवसेना मजबूत झाली पाहिजे यासाठी आम्ही त्यांच्या पाठिशी उभे आहोत. निश्चितपणे भविष्यात आमची महायुती अजून मजबूत होताना दिसेल, असे ते म्हणालेत.



नागपूर (वृत्तसंस्था)-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अर्ध्याहून अधिक आमदार आपल्या संपर्कात असल्याचा दावा सत्ताधारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे. हे आमदार ठाकरेंच्या कार्यपद्धतीला कंटाळले आहेत. त्यामुळे त्यांनी आमच्यासोबत येण्याचा मानस व्यक्त केला आहे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी आपल्याकडे या आमदारांची नावे असल्याचाही व प्रसंगी ते जाहीर करण्याचाही इशारा दिला.राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ठाकरे गटाचे आमदार विरोधी पक्षनेते होणार असल्याच्या चर्चेचे पेव फुटले. पत्रकारांनी याविषयी आदित्य यांना छेडले असता त्यांनी या चर्चेत कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट केले. यावेळी त्यांनी शिंदे गटाचेच २० आमदार कुठेतरी (भाजप) जाणार असल्याची चर्चा आपल्या कानावर असल्याचे सांगितले. त्यांच्या या विधानामुळे शिंदे गटाच्या आमदारांचा एक मोठा गट भाजपच्या संपर्कात असल्याची चर्चा सुरू झाली. या पार्श्वभूमीवर संजय शिरसाट यांनी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना वरील दावा केला आहे.

शिवसेनेच्या ठाकरे गटाचे १३ आमदार माझ्या संपर्कात आहेत. या सर्व आमदारांची नावे माझ्याकडे आहेत. वेळ आल्यावर मी ती सांगेन. या आमदारांनी ठाकरे गटाच्या कार्यपद्धतीला वैतातगून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत येण्याचा मानस व्यक्त केला आहे, असे संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. शिरसाट यांच्या या दाव्यामुळे आपले आमदार एकसंध ठेवण्याच्या प्रयत्नांत असलेल्या उद्धव यांच्या प्रयत्नांना झटका बसण्याची भीती निर्माण झाली आहे.

पत्रकारांनी आदित्य ठाकरे यांना त्यांच्याकडे विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी सोपवण्याची चर्चा सुरू असल्याच्या मुद्यावर प्रतिक्रिया विचारली. त्यावर आदित्य यांनी ही पेरलेली बातमी असून, अफवांवर विश्वास ठेवू नका, असे स्पष्ट केले. तसेच कोणत्या तरी गटाचे २२ आमदार दुसरीकडे जाणार असल्याची चर्चा आपल्या कानावर असल्याचेही ते यावेळी म्हणाले. माझ्याकडे विरोधी पक्षनेतेपद सोपवण्याच्या चर्चेत कोणतेही तथ्य नाही. ही पेरलेली बातमी आहे. अफवांवर विश्वास ठेवू नका. पण मीच २२ आमदार कोणत्या तरी गटातून दुसरीकडे जात आहेत हे ऐकले आहे, असे ते म्हणाले.

---

## केज शहरातील विविध महाविद्यालयाच्या वतीने एड्स जनजागृतीसाठी रॅली

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी




दि.१डिसेंबर राष्ट्रीय एडस दिनानिमित्त दि.९ डिसेंबर २०२५ रोजी वसंतफार्मसी कॉलेज केज,कमल नर्सिंग कॉलेज केज,उप-जिल्हा रुग्णालय केज यांच्या संयुक्त विद्यमाने केज शहरामध्ये एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.रॅलीची सुरुवात वसंत फार्मसी कॉलेज केज येथून बाबुरावजी आडसकर महाविद्यालया चे प्राचार्य डॉ.श्री.फावडे सर यांच्या हस्ते फीत कापून रॅलीला सुरुवात करण्यात आली या मध्ये उपस्थित सर्व विध्यार्थीनी हातामध्ये जनजागृतीच्या घोष वाक्याचे फलक घेऊन घोषणा देत केज शहर दनाणुन सोडले होते या मध्ये जोश पूर्ण घोषणा देत रॅली कानडी रोड मार्गे बसस्थानक ते तहसील कार्यालय या ठिकाणी जाऊन समारोप करण्यात आला.यावेळी नायब तहसीलदार श्री.भंडारी साहेब,रोटरी क्लब ऑफ केजचे श्री.हनुमंत भोसले सर,प्राचार्य डॉ.श्री.हनुमंत सौदागर सर,प्राचार्य श्री. अविनाश थळकरी सर, समुपदेशक सौ.साकसमुद्रे मॅडम उपस्थित होते. समारोपाच्या वेळी उपस्थित विध्यार्थीना नायब तहसीलदार श्री. भंडारी सर यांनी मार्गदर्शन करून कौतुक केले व चांगल्या कार्या बद्दल शुभेच्छा दिल्या.हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी समन्वयक प्रा. महादेव लांडगे यांच्यासह प्रा.राम चौरे,प्रा.कांबळे सतीश,प्रा.राऊत अभिजित,प्रा.सावरे धनराज,प्रा.सौ.रसाळ मनीषा,प्रा.सौ.प्रतीक्षा कोरे,प्रा.प्रणिता चौरे,प्रा. कोपले अंबिका,प्रा.दांगट स्नेहल,शेख सद्दाम,शेख मोहसीन,खयामोद्दीन शेख,कांबळे अशोक आदींनी परिश्रम घेतले.

---

## समग्र शिक्षा करार कर्मचाऱ्यांनी घेतली प्रा.मनोहर धोंडे यांची भेट

दैनिक वादळ वार्ता
लोहा । राजकुमार पिल्लोळे



> आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी लोकशाही मार्गाने शांततेत आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. तो घटनेनं प्रत्येकाला दिलाय. तुम्हीं तुमचे म्हणणे शासनाला पटवून देऊ शकता. ज्यांची पोट भरली ते रस्त्यांवर उतरून दंड थोपटताय, तुम्ही तर गेली २० वर्षापासून उपाशी आहात, तुमच्यावर खूप अन्याय झालाय, एकजुटीने सामोरे जा व आपला हक्क मागा, माझा तुम्हांला पाठिंबा आहे.
> -प्रा. मनोहर धोंडे ,सेवा जनशक्ती पार्टी संस्थापक अध्यक्ष

समग्र शिक्षा करार कर्मचाऱ्यांच्या वतीने अभ्यास समग्र शिक्षा करार कर्मचारी समिती सदस्य प्रा. मनोहर धोंडे यांची नुकतीच दि.(४) डिसेंबर रोजी सेवा जनशक्ती पार्टीच्या लोहा येथील कार्यालयात सदिच्छा भेट घेतली.याबाबत सविस्तर वृत्त असे की, राज्यातील समग्र शिक्षा करार कर्मचाऱ्यांच्या वतीने नागपूर अधिवेशन काळात ८ डिसेंबर २०२५ पासून अन्नत्याग व ठिय्या आंदोलन करणार असून सदरील आंदोलनास भेट देण्यासाठी राज्यातील विविध विभागांतील विविध कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावणारे एकमेव रोख ठोक भुमिका घेणारे बुद्धीमान धाडसी नेतृत्व सेवा जनशक्ती पार्टी चे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी भेट द्यावी जेणेकरून आमचा प्रश्न मार्गी लागण्यास फार मोठी मदत होईल असे म्हणत तशी विनंती केली.त्यावेळी क्षणाचाही विलंब न लावता प्रा.मनोहर धोंडे यांनी होकार दर्शविला.यावेळी धाराशिव, लातूर, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड आदी जिल्ह्यातील बहुसंख्य समग्र शिक्षा बहुसंख्येने केडर कर्मचारी उपस्थित होते.

---

## केज पंचायत समितीचा ढिसाळ कारभार,वजन ठेवल्याशिवाय कागद हालत नाही लाभार्थींनी व्यक्त केली खंत

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी



केज पंचायत समितीच्या कामकाजाबाबत नागरिकांमध्ये असंतोष वाढताना दिसत आहे. विविध शासकीय योजनांच्या फायली पुढे नेण्यासाठी 'वजन' ठेवावे लागते,अशी तक्रार काही लाभार्थ्यांनी केली आहे. पंचायत समिती कार्यालयात येणाऱ्या जनतेची कामे वेळेवर होत नसल्याने सामान्य नागरिकांचे हाल होत असल्याचे चित्र समोर येत आहे.शासकीय योजना पासून विविध परवानग्या तसेच दैनंदिन प्रशासकीय कामासाठी नागरिकांना वारंवार पंचायत समिती कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. अनेक वेळा आवश्यक कागदपत्रे पूर्ण असूनही फाईल पुढे सरकत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.वजन ठेवल्याशिवाय कागद हलत नाही असा थेट आरोप लाभार्थी नागरिकांकडून करण्यात येत असल्याने पंचायत समितीच्या ढिसाळ कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक जनतेचे म्हणणे आहे की,शासनाच्या विविध लाभदायक योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो.सतत होणाऱ्या विलंबामुळे शेतकरी,गोरगरीब लाभार्थी तसेच एकंदर सर्वसामान्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून प्रशासनाने या अनागोंदी कारभाराला आळा घालावा अशी मागणी सातत्याने केली जात आहे.लोकांच्या वाढत्या नाराजीमुळे कारभारात पारदर्शकता आणणे व तक्रार निवारण यंत्रणा प्रभावी करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.वाढत्या गैरव्यवहाराच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी संबंधित विभागाने तातडीने चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करावी तसेच पंचायत समितीच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी परिणाम कारक तक्रार निवारण व्यवस्था उभा करावी असा ठाम आग्रह व्यक्त केला आहे.स्थानिक सामाजिक संघटनांनीही या प्रकरणाची दखल घेण्याची आवश्यकता आहे.नागरिकांच्या सुविधांसाठी कार्यप्रणाली अधिक पारदर्शक करण्याची मागणी केली जात आहे.

---

## 'संसदीय संकुल विकास परियोजना'अंतर्गत केलेल्या शेतीपूरक कामांचे दिल्लीत कौतुक!

### माजी खासदार डॉ.हिनाताई गावित यांच्या प्रयत्नांना राष्ट्रीय स्तरावर दाद नंदुरबारच्या २५ हून अधिक गावांत विकासाची यशस्वी अंमलबजावणी

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी



संसदीय संकुल विकास परियोजना अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यात केलेल्या उत्कृष्ट शेतीपूरक विकास कामांबद्दल माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांच्या प्रयत्नांचे दिल्ली येथे झालेल्या समीक्षा बैठकीत वरिष्ठांनी भरभरून कौतुक केले. माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांनी यावेळी बोलताना सांगितले की, या कौतुकामुळे शेतीपूरक विकास कामांसाठी आणखी प्रेरणा मिळाली असून, केंद्रीय मदत मिळवण्यासाठी आपण विशेष प्रयत्न करणार आहोत.

दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी दिल्ली येथे भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा संसदीय संकुल विकास प्रकल्पाची महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. राष्ट्रीय संघटनेचे सरचिटणीस बी. एल. संतोष , राष्ट्रीय संघटक व्ही.सतीश जी, आणि योजकचे प्रमुख डॉ. गजानन डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली. या बैठकीस भाजप अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष समीर उरांव, आदिवासी व्यवहार राज्यमंत्री दुर्गादास उईके , आणि केंद्रीय महिला व बाल विकास राज्यमंत्री सावित्री ठाकूर उपस्थित होते. या महत्त्वाच्या बैठकीत माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांनी स्वतः उपस्थित राहून आपल्या कामाचे सादरीकरण केले.

डॉ. हिना गावित यांनी नंदुरबार तालुक्यातील जळके, रनाळे खुर्द, कळंबा, वडझाकण, पावला अशा पंचवीसहून अधिक गावांमध्ये सेवाभावी संस्था, बचत गट आणि स्वयंसहायता समूह गटाच्या माध्यमातून केलेल्या कामांची माहिती सादर केली.

या कामांमध्ये सेंद्रिय निविष्ठा निर्मिती, ठिबक सिंचन, किचन गार्डन किट वाटप, गांडूळ खत निर्मिती यांसारख्या नाविन्यपूर्ण आणि शेतीपूरक उपक्रमांचा समावेश होता. नव्या कल्पना आणि कार्यपद्धती वापरून केलेल्या या कामांचे सादरीकरण वरिष्ठांसमोर करताना मिळालेल्या समाधानाचा उल्लेख त्यांनी केला. या कार्याचे उपस्थित वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.

## संपादकीय

# पुतिन भेटीतील 'अर्थ'

तिन यांच्या भारत भेटीची आज जागतिक पातळीवर चर्चा होत असली तरी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत २३व्या भारत–रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी भारतात आले आहेत. रशिया–युक्रेन युद्धानंतर राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचा हा पहिला दौरा आहे. राष्ट्राध्यक्ष पुतिन भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांसाठी भारताच्या राष्ट्रपती मेजवानीचे आयोजन करतील. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यापूर्वी २०२१ मध्ये भारत दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी २१व्या भारत–रशिया वार्षिक शिखर परिषदेला उपस्थिती लावली होती.कोणत्याही बलाढ्य राष्ट्राचे प्रमुख आपल्या देशामध्ये भेटीस आल्यावर त्यांच्या कार्याची, खासगी आयुष्याची, मालमत्तेची, राहणीमानाची प्रसिद्धी माध्यमांमध्ये चर्चा होणे स्वाभाविकच असते. कोणीही राष्ट्राध्यक्ष अथवा त्या त्या देशांचे पंतप्रधान भारत भेटीवर आल्यास आपल्या देशासोबत त्यांचे विविध क्षेत्रांतील गुंतवणुकीचे करार होतात, उद्योगधंद्याची, शस्त्रांची देवाणघेवाण, खरेदीविक्री होते. पण, अन्य देशाचे राष्ट्राध्यक्ष व पंतप्रधान येणे व रशियाचे राष्ट्रपती आपल्या देशात येणे यात फरक आहे.स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताचे आणि रशियाचे मित्रत्वाचे संबंध आहेत. सुबत्तेच्या तसेच पडझडीच्या काळातही दोन्ही देशांच्या मैत्रीमध्ये खंड पडलेला नाही. शेजारील राष्ट्र पाकिस्तान सातत्याने आपल्याला त्रास देत असताना, आपल्या कुरापती काढत असताना, आपल्या देशात दहशतवादी कारवायांना खतपाणी घालत असताना अमेरिकेने सातत्याने पाकिस्तानची पाठराखण केली आहे. त्यावेळी रशियाने आपल्यामागे उभे राहत खऱ्या मित्राची भूमिका जागतिक पातळीवर निभावली आहे. भारत–रशिया मैत्रीमुळेच अमेरिकेचा पूर्वीपासूनच तिळपापड झाला आहे. त्यातूनच अमेरिकेने आपल्यावर वाढीव आयात शुल्काचा(टॅरिफ) भुर्दंड लादलेला आहे. खनिज तेलाची खरेदी हे तर केवळ निमित्त आहे. भारतातील कंपन्या रशियाकडून तेलखरेदी करत असल्याच्या प्रकाराला अमेरिकेचा आक्षेप आहे. त्याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प वेळोवेळी आकांडतांडवही करत भारतविरोधी संताप व्यक्त करत आहेत. आपल्या देशात आलेल्या परदेशातील पंतप्रधान, राजे, राष्ट्रपती, राष्ट्राध्यक्ष यांच्या सुरक्षेची जबाबदारी आपली असते. पण जागतिक पातळीवर वाढत चाललेली स्पर्धा, त्यातून निर्माण झालेली राजकीय वैर, भूभाग संपादनांची महत्त्वाकांक्षा, हद्दविस्तार करण्याची कार्यप्रणाली यातून राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्या जीवाला धोका वाढलेला असतो. त्यामुळे अमेरिका, रशियासारख्या राष्ट्रांचे प्रमुख स्वत:सोबत आपली सुरक्षाही घेऊन फिरत असतात. त्यांचा आपल्या सुरक्षा व्यवस्थेवर विश्वास असतो. या दौऱ्यादरम्यान पुतिन त्यांच्या अधिकृत कारमधून प्रवास करत आहेत. रशियाची राष्ट्राध्यक्षांसाठी असलेली अधिकृत सरकारी कार 'ऑरस सेनेट लिमोझिन' आहे. ही कार शस्त्रभेदी गोळ्या आणि ग्रेनेड हल्ल्यांना तोंड देऊ शकते. यात पंक्चर झाल्यावरही चालणारे टायर, आपत्कालीन दरवाजे आणि रशियाच्या फेडरल प्रोटेक्टिव्ह सर्व्हिसच्या मानकांनुसार बनवलेली सुरक्षा आहे. पुतिन यांच्या दौऱ्यावर अमेरिकेसह, युरोप, चीन आणि पाकिस्तान या देशांचे लक्ष आहे. कारण रशिया आणि भारतामध्ये जे करार होतील, त्याचे दूरगामी परिणाम या देशांवर होऊ शकतात. म्हणून पुतिन यांचा भारत दौरा महत्त्वाचा आहे. दोन्ही देशांमध्ये क्रूड ऑइल करार, संरक्षण आणि मुक्त व्यापार करारावर (एफटीए) यासह विविध विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. पुतिन यांच्या या दौऱ्यात सर्वाधिक लक्ष संरक्षण करारावर असेल. दोन्ही देशांच्या नौदलांसाठी एकत्रितपणे युद्धनौका योजनांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.पाकिस्तानच्या अलीकडच्या काळात वाढत चाललेल्या कुरापती पाहता, पुतिन यांच्या दौऱ्यातील संरक्षण चर्चा हा सर्वाधिक लक्ष लागलेला भाग असेल, अशी अपेक्षा आहे. भारत अतिरिक्त एस–४०० हवाई संरक्षण प्रणालीसह अनेक प्रलंबित खरेदी प्रक्रिया पुढे नेण्यास उत्सुक आहे. नागरी अणुऊर्जा हा आणखी एक विषय आहे, ज्यावर चर्चेची शक्यता आहे. पुतिन यांच्या या भेटीत दोन्ही देश एक नवीन पेमेंट प्रणाली तयार करण्यावर सहमत होऊ शकतात, ज्यामुळे व्यापार अखंडितपणे सुरू राहील. ऐतिहासिकदृष्ट्या, भारत हा रशियाच्या शस्त्रास्त्रांचा सर्वात मोठा खरेदीदार आहे आणि सुखोई–३० विमाने भारतीय हवाई दलाचा भाग आहे. या शिखर परिषदेत संरक्षण मंत्र्यांच्या महत्त्वपूर्ण हार्डवेअर खरेदीबाबतच्या चर्चांचा समावेश आहे. रशियाकडून ५ लाख ८५ हजार कोटी आयात, तर भारताची केवळ ४५ हजार कोटींची निर्यात आहे, या व्यापार असंतुलनामुळे औषधे आणि कृषी उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्याची गरज अधिक आहे. रशियाकडून तेल खरेदीमुळे भारतीय वस्तूंवर अमेरिकेने २५–५०% पर्यंत शुल्क लादले आहे. यामुळे भारत–अमेरिकेदरम्यान भू–राजकीय तणाव वाढला आहे. त्यामुळे नवीन करारांवर सावधगिरी बाळगण्याची शक्यता आहे. नागरी अणुऊर्जा आणि युरेशियन मुक्त व्यापार चर्चा यांसारख्या इतर मुद्द्यांवरही लक्ष केंद्रित केले जाईल. क्षेपणास्त्र घटक आणि लढाऊ विमानांच्या अपग्रेडेशनच्या संयुक्त उत्पादनावर लक्ष केंद्रित केले जाईल, ज्यामुळे भारताच्या आत्मनिर्भरतेच्या मोहिमेला बळ मिळेल. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड विमानांचे उत्पादन करते, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड इलेक्ट्रॉनिक्समध्ये आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेड क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये आघाडीवर आहे. या क्षेत्रात प्रगती झाल्यास बहुवर्षीय करारांची शक्यता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे गुंतवणूकदारांचे लक्ष निकालापूर्वीच या कंपन्यांकडे लागून आहे. भारत–रशिया मित्र राष्ट्र असली तरी एकमेकांना त्यांनी आजवर व्यापाराच्या माध्यमातून मदत केली आहे. या दौऱ्यात संरक्षण सहकार्यासोबतच व्यापार आणि ऊर्जा सुरक्षा यावर भर दिला जाईल. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसंदर्भातील घोषणांमुळे संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांच्या शेअर्समध्ये तेजी दिसू शकते, अशी बाजार तज्ज्ञांना अपेक्षा आहे. या भेटीमुळे उभय राष्ट्रांमधील संबंध वृद्धिंगत होतील, व्यापार वाढेल, भारत–रशियाविरोधी राष्ट्रांना या भेटीतून चपराक बसेल, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

# संत रविदास सामाजिक भवन व राजगृह बुद्ध विहार येथे ८२ विद्यार्थ्यांना वही पेन वाटप



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आपल्या उद्धारकर्त्याला महापरिनिर्वाणदिनी अभिवादन करून जय भीम चा नारा देऊन महामानव अभिवादन ग्रुपला शालेय साहित्य वही पेन दान करून मिळालेल्या दानातून प्रथम फेरीत संत रविदास सामाजिक भवन संत रविदास नगर व राजगृह बुद्ध विहार भीम नगर जुना मोंढा रोड येथे एकूण ८२ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य( वही पेन) वाटप करण्याचा प्रारंभ कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते मनोज कांबळे अध्यक्षपदी तर उद्घाटक म्हणून सेवानिवृत्त सी.ई.ओ बनसोडे पी.व्ही. व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.गजानन चित्रे लाभले होते. अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले,वाचाल तर वाचालचे फिरते मोफत वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी.वानखेडे सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एल.आय.सी यु.एस.वाघमारे, बी. जी. दळवी यांची विचार मंचावर प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम जगद्गुरु संत रविदास व भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मन्यावराच्या हास्ते पुष्प माला अर्पण करून दीप प्रज्वलन करून विन्रम अभिवादन करण्यात आले व वर्षभर वही पेन वाटप कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डी.एम राऊत यांनी केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा.गजानन चित्रे आपले उद्बोधक विचार व्यक्त करताना म्हणाले की जय भीम हा नारा क्रांतिकारी नारा आहे. तो स्फूर्तीदाही आहे. ज्या महापुरुषांच्या नावाचा हा नारा आहे त्यांचा बहुमोल उपदेश व कार्य अंधारातून प्रकाशाकडे म्हणजे अज्ञानाकडून ज्ञानाकडे नेणारा कल्याणकारी मार्ग आहे. त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी मिळालेल्या दानातून विद्यार्थ्यांना मिळणारी वही पेन हे उच्च शिक्षण घेण्याची प्रेरणादायी स्तोत्र आहे. हे सर्वांनी लक्षात ठेवून आपल्या पुढील जीवनाची वाटचाल ठेवावी हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. अध्यक्षीय समारोपात कांबळे मनोज यांनी शिक्षणाचे महत्त्व व त्याकरता करावे लागणारे कष्ट याबद्दल डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक प्रसंग विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगितले. राजगृह बुद्ध विहारातील शालेय साहित्य वाटप प्रसंगी कु. नलिनी धन्वे या विद्यार्थिनीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अस्कलितपणे इंग्रजीत भाषण केले. तिचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन करून वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय तर्फे वही पेन व क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांचे जीवन चरित्र पुस्तक मान्यवरांच्या हस्ते देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आयु. सुभाष गायकवाड यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास रवींद्र टेकाळे, राजेंद्र गायकवाड, रवींद्र माने, संघमित्रा वाघमारे, व पालक सह व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. शरणातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सिद्धिविनायक मंदिर भक्त मंडळीच्या वतीने सेवानिवृत्त सैनिक गोपाळ किशनराव गुंडावाड यांचा सन्मान



दैनिक वादळ वार्ता
**हनुमंत चंदनकर । मुखेड**

डोंगराळ भागात तब्बल १८ वर्षे भारत मातीची सेवा करून परतणाऱ्या मुखेड तालुक्यातील चोंडी येथील सेवानिवृत्त सैनिक गोपाळ किशनराव गुंडावाड यांचा आज दिनांक ७ डिसेंबर रोजी बेटकबिलोली रोड गणेश नगर खैरगांव नायगांव रोडवर असलेल्या सिद्धिविनायक गणेश मंदिर भक्त मंडळाच्या वतीने संकट चतुर्थीच्या निमित्ताने १८ वर्ष मातृभूमीची सेवा करून परतणाऱ्या गोपाळ किशनराव गुंडावाड रा चोंडी तालुका मुखेड येथील सैनिकांचा सत्कार करण्यात आला यावेळी संकट चतुर्थी निमित्त सिद्धिविनायकाची पुजा आरती करून सेवानिवृत्त सैनिकाचा सत्कार करण्यात आला यावेळीमंदिर पुजारी गंगाधर स्वामी खैरगांवकर डॉ ज्ञानेश्वर जाधव सर , संदिप कुलकर्णी सर ,खरमोड सर, सर, ,तळणे , नरवाडे सर, पांचाळ, जिल्ह्यावार, हांडे, गंगाधर मुलगे आप्पा,जुक्कलकर,ठकरवाड डॉ झुंजारे सर , पंढरीनाथ जाधव सर परिसरातील भाविक भक्त नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कारानंतर भव्य महाप्रसादाचा आयोजन करण्यात आलं होतं

# छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या ऊस बिलाचा हप्ता रु.२७५०/–प्रमाणे बँकेत वर्ग–व्हा.चेअरमन मोहनराव जगताप

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

छत्रपती सहकारी साखर कारखाना लि. सोनोजीनगर सावरगाव ता. माजलगाव जि. बीड या कारखान्याचा गळीत हंगाम २०२५–२६ मधील दि.०१/११/२०२५ ते १५/११/२०२५ या कालावधीत एकूण ४५५४२.९९० मे. टन ऊसाचे गाळप झाले आहे. त्यानुसार प्रति टन रु. २७५०/– प्रमाणे एकूण रक्कम रु. १२,५२,४३,२९६/– रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.



काही दिवसांपूर्वी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ऊस दरवाढीबाबत आंदोलन पुकारण्यात आले होते. या आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून छत्रपती सहकारी साखर कारखान्याने प्रति टन २७५०/– रुपये भाव जाहीर केला आणि तो एकरकमी देण्याचे घोषित केले होते, आंदोलकांनी हे मान्य करून याचे स्वागत केले. आज युवा शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलकांचा सन्मान करत दि.०१ नोव्हेंबर २०२५ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गाळप झालेल्या ऊसाचे बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.

कारखान्याच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करून ऊसाचे गाळप सुरळीत सुरू ठेवले असून सर्व शेतकऱ्यांचे बिल वेळेवर बँकेत जमा करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.कारखान्याचे चेअरमन मा. बाजीराव सोनोजीराव जगताप व संचालक मंडळ यांनी कारखान्याची गाळप क्षमता मर्यादित असतानाही शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण अवलंबून कोणताही बाय–प्रॉडक्ट नसतांना सुद्धा योग्य भाव दिला आहे. भागातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या कारखान्यास सहकार्य करावे व आपापली बिले संबंधित बँकेत संपर्क करून मिळवावीत, अशी विनंती कारखाना प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

# स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त स्वामी विवेकानंद शाळेमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन



**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि. १२ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी सकाळी ठीक ९ ते २ या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रक्तदान शिबिराचे हे ३१ वे वर्ष आहे. या रक्तदान शिबिराचे काम केज येथील डॉ. श्रीकृष्ण नागरगोजे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी उपजिल्हा रुग्णालय केज व जिल्हा रुग्णालय बीड तसेच त्यांची टीम पाहणार आहे.

तरी बहुसंख्य रक्तदात्यांनी या रक्तदान चळवळीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळ केज तसेच स्वामी विवेकानंद विद्यामंदिर प्राथमिक व माध्यमिक विभाग, केज, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज तसेच स्व. प्रमोद महाजन कनिष्ठ महाविद्यालय केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'हे' सुंदर फूल केवळ सजावटीसाठी नाही तर आरोग्यासाठी आहे फायदेशीर

आपल्या आसपास अशी अनेक फुले आहेत जी दिसायला खूप सुंदर आणि सुगंधित आहेत. त्यामुळे प्रत्येकजण त्यांच्या आवडीनुसार घराच्या भोवती लावता आणि ती फुलं तुमच्या घराचे सौंदर्य वाढवतात. अशातच असे एक फूल आहे जे तुमच्या घराचे सौंदर्य वाढवण्याबरोबरच तर तुमचे आरोग्य तंदुरस्त राखण्यासाठी खुप ओळखले जाते. आपण सूर्यफुलाबद्दल बोलत आहोत. हे फूल केवळ बागेपुरतेच मर्यादित नाही तर घराचे सौंदर्य वाढवण्या सोबत आरोग्यासाठी देखील उपयुक्त आहे. त्यात औषधी गुणधर्म देखील आहेत जे अनेक आरोग्य फायदे प्रदान करतात.

**सूर्यफूलाचे फायदे**

आयुर्वेदात सूर्यफुलाला खूप महत्व आहे. या फुलाचे बिया, पाने आणि तेल शतकानुशतके शारीरिक आणि मानसिक समस्यांवर उपचार करण्यासाठी वापरले जात आहेत.



सूर्यफूल फुलांमध्ये ट्रायटरपीन ग्लायकोसाइड्स नावाचे संयुगे भरपूर प्रमाणात असतात, जे बॅक्टेरियाशी लढण्यासाठी, वेदना कमी करण्यासाठी आणि जळजळ कमी करण्यासाठी अत्यंत प्रभावी असतात. ते अँटीऑक्सिडंट्समध्ये देखील समृद्ध असतात, जे हृदय आणि थायरॉईडच्या आरोग्यास समर्थन देतात. म्हणून या फुलाचे तेल आरोग्यासाठी जास्त फायदेशीर ठरतात.औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या सूर्यफुलांचे सेवन केल्याने सांधेदुखी, संधिवात आणि शरीराच्या जडपणापासून आराम मिळतो.

जर तुम्हाला सतत बद्धकोष्ठता, पोटफुगी, गॅस आणि जंतांच्या समस्या असतील तर या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी सूर्यफुलांचा वापर करता येतो. यामुळे पचनसंस्था मजबूत होते. सूर्यफुलाचे तेल, मलम किंवा बियांचे सेवन केल्याने फोड, खाज आणि त्वचेच्या आजारांवर फायदेशीर ठरते. आयुर्वेदिक तज्ञांच्या मते, जर तुम्हाला ताप असेल तर तुम्ही सूर्यफुलाच्या पानांपासून बनवलेला काढा किंवा चहा घेऊ शकता. सूर्यफुलाची फुले हृदय आणि थायरॉईडसाठी देखील चांगली असतात. अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असल्याने हे फुल हृदयरोगापासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात. सूर्यफुलाच्या बियांमध्ये ओमेगा–६ फॅटी सिड, व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, सेलेनियम आणि झिंक भरपूर प्रमाणात असतात. तुम्ही तुमच्या जेवणात सूर्यफूल तेल वापरा. कारण हे तेल शरीरात चांगले कोलेस्ट्रॉल वाढवते. तथापि ते सेवन करण्यापूर्वी आयुर्वेदिक डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# बेशिस्त वाहन चालकांमुळे अपघात होण्याची शक्यता सर्रास सिग्नल तोडून वाहतूक नियमाचे करतात उल्लंघन

## बेशिस्त वाहन चालकांना ना कायद्याचा भीती ना प्रशासनाचा धाक;अशा वाहन चालकांवर कारवाईची मागणी

बदलापूर । दैनिक वादळ वार्ता

कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीत लोकसंख्या बरोबर वाहनाची संख्या झपाट्याने वाढत आहे आजकाल प्रत्येकजण आपल्या सोयीसाठी वाहनांचा वापर करतो. त्यामुळे वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. या वाढत्या संख्येसोबतच अपघाताचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे. बदलापूर शहरांमध्ये, चौकांमध्ये, गावांमध्ये वाहतूक कोंडी आणि अपघात होत आहेत अशातच अपघात व वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पालिका प्रशासनाने बदलापूर शहरामध्ये अनेक चौकात सिग्नल बसवले आहेत तर अनेक चौकाचे नूतनीकरण करून मोठे केली असून रस्ते ही रुंदीकरण केले आहेत यामुळे अनेक ठिकाणची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नगरपालिकेला यश मिळाले असला तरी वाहतूक नियमाचे उल्लंघनाचे प्रमाणही वाढले आहे काही वाहन चालक बिनधास्तपणे सिग्नल तोडत आहेत व सिग्नल तोडल्याने कोणतीही कारवाई होत नसल्याने वारंवार चालकांकडून सिग्नल तोडण्याचे प्रमाणही वाढले आहे यामुळे मोठा अपघात ही होण्याची शक्यता नाकारता येत नाही सिग्नल यंत्रणांमुळे बदलापूर मधील वाहतूक कोंडी सुटल्यास मदत झाली परतू सिग्नलयंत्रणे हे सीसीटीव्हीच्या देखरेखीखाली नसल्याने बेशिस्त वाहन चालकांना सिग्नल यंत्रणेचा कोणताही फरक पडत नसल्याचे दिसत आहे या वाहन चालकांमुळे नगरपालिकेला पुन्हा नवीन आव्हान निर्माण झाला आहे सिग्नल तोडणाऱ्या व बेशिस्तपणे वाहन चालवणाऱ्यांना आळा घालण्यासाठी नगरपालिका व वाहतूक पोलिसांनी प्रशासनाने कठोर पावले उचलून कारवाई करावी जेणेकरून भविष्यात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या चालकांना धाक बसुन नियमाचे पाळण होईल स्मार्ट सिटीच्या स्वप्न पाहणाऱ्या बदलापूरकरांना मात्र काही सेकंदाच्या सिग्नलसाठी थांबणे अवघड झाल्याचे दिसत आहे वाहतूक नियम धाब्यावर बसून बेशिस्त वाहन चालक सर्रास सिग्नल तोडून वाहतूक नियमाचे उल्लंघन



करून अपघाताला निमंत्रण देत आहे बेशिस्त चालकांना कायद्याचे धाक आहे की नाही असे प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे रस्त्यावर वाहन चालवताना काही नियम असतात. सिग्नल, हेल्मेट, लायसन्स असणाऱ्या व्यक्तीनेच वाहन चालवायला हवे, असे नियम प्रत्येक वाहनचालकाने पाळायला हवे. जर तुम्ही हे नियम पाळले नाही तर कदाचित अनर्थ होऊ शकतो. सिग्नल न पाळल्यास अपघातदेखील होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने वाहतुकीचे नियम पाळायलाच हवे परतू दुर्दैवी याउलट मात्र बदलापूरमध्ये नियमांचे पालन करणाऱ्या चालकांना बेशिस्त वाहन चालकांकडून हिणवण्यात येते यामुळे बेशिस्त वाहन चालकांवरती कठोर कारवाई करून दंड वसूल करावा व सिग्नल यंत्रणेने हे सीसीटीव्ही देखरेखीखाली ठेवावीत अशी मागणी आता नागरिक करत आहेतवाहनांची वाढती संख्या, वेगमर्यादेचे उल्लंघन, वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष, मद्यपान करून वाहन चालवणे, मोबाईलचा वापर आणि रस्त्यांची खराब अवस्था यांसारख्या अनेक कारणांमुळे निष्पाप लोकांचे जीव जात आहेत किंवा त्यांना कायमचे अपंगत्व येत आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी वाहनचालकांनी दक्षता घेणे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.भारतात रस्ते अपघातांचे प्रमाण चिंताजनक आहे. वेगावर नियंत्रण न ठेवणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे आणि निष्काळजीपणा यामुळे अनेक जीव जातात वाहनांची वेगमर्यादा पाळणे, सिग्नल पाळणे,हेल्मेट आणि सीट बेल्टचा वापर करणे आवश्यक आहे असे केल्यास हे अपघात प्रमाण नक्कीच कमी होईल.

# आमच्या शहरात असे कधीच घडले नव्हते–एकनाथ खडसे

दैनिक वादळ वार्ता

आमदार चंद्रकांत पाटील हे गुर्मीमध्ये आणि मस्तीमध्ये आहेत. त्यांची प्रवृत्ती गुंडागर्दीची आहे. यापूर्वीदेखील त्यांच्यावर असे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यांनी काल मुक्ताईनगरमध्ये १००-सव्वाशे दुचाकीवर दोनशे अडीचशे गुंड जे वाळू माफिया आहेत त्यांना बाहेरुन बोलावून घेत दहशत पसरवण्याचे काम केले आहे,असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार एकनाथ खडसे यांनी केला आहे.



एकनाथ खडसे म्हणाले की, काल सकाळपासून मुक्ताईनगर शहारामध्ये दहशतीचं आणि भीतीचे वातावरण पसरवण्याचा प्रयत्न आमदारांच्या केला गेला. या ठिकाणी शिवसेनेचे आमदार आहेत असे म्हणत त्यांनी नाव न घेता शिवसेना आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावर अप्रत्यक्ष निशाणा साधला आहे. दुपारनंतर त्यांनी बाहेरुन गुंड आणले त्यांच्याकडे शस्त्र होती. आमदार गाडी घेऊन पुढे चालायचे आणि त्यांच्यामागे १०० सव्वाशे दुचाकीवर दोनशे अडीचशे गुंड जे वाळू माफिया होते जे जळगाव, भुसावळ आणि बुऱ्हाणपूरचे होते.एकनाथ खडसे म्हणाले की, यातील बरेच वाळू माफियांचे चेहरे मला परिचित आहेत. मी मंत्री असताना त्यांना बऱ्याचदा मध्येही टाकले होते. या सर्वांच्या सहित दहशतीचे वातावरण पसरवण्याचा प्रयत्न स्थानिक आमदारांनी केला. आमदारांना विचारले तर मला रस्ताने जाण्यास मनाई आहे का? असा सवाल करत असल्याचे खडसेंनी म्हटले आहे.

एकनाथ खडसे म्हणाले की, मतदान केंद्रामध्ये दोन दोन तास बसून राहणं मतदारांना धाक दाखवत दडपशाही करणे आणि काही ठिकाणी मारहाण करण्याचे प्रयत्न केले. मुक्ताईनगर हे शांत शहर आहे. यापूर्वी असे कधीही झालेले नाही. काल आमदारांच्या कार्यकर्त्यांनी विरोधकांना जबर मारहाण केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. आता सर्व चित्रीकरण घेत आचारसंहिता भंग केल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करणार आहोत.एकनाथ खडसे म्हणाले की, मुक्ताईनगरमध्ये जर आम्ही दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला असेल असा आरोप आमदार करत असतील तर त्यांनी त्यांच्याकडे जर पुरावे असतील तर आमच्याविरोधात गुन्हा दाखल करावा.


# केडगाव परिसरातील बिबट्या जेरबंद करण्यासाठी पिंजऱ्यांची संख्या वाढवा

## वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता

अहिल्यानगर । प्रतिनिधी

केडगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचे दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिस्थितीत सामाजिक कार्यकर्ते वैभव पाचारणे यांनी वन विभागाकडे पिंजऱ्यांची संख्या वाढविण्याची मागणी केली आहे. त्यांनी यासंदर्भात वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन दिले.



केडगावमधील विविध भागांत नागरिकांनी बिबट्याचे अनेकवेळा दर्शन घेतल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यामुळे शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनतेमध्ये भीतीचे वातावरण आहे. संध्याकाळनंतर नागरिक अनावश्यकपणे बाहेर पडणे टाळत आहेत, तर शेतकऱ्यांनाही शेतात जाण्याची धास्ती वाटत आहे.

वैभव पाचारणे यांनी सांगितले की, वन विभागाने आतापर्यंत काही प्राथमिक उपाययोजना केल्या असल्या तरी त्या अपूर्ण आणि तोडक्या पडत असून बिबट्याला पकडण्यासाठी पुरेशी तयारी झालेली नाही. बिबट्याचा वावर असलेल्या विविध ठिकाणी पिंजरे बसवणे आवश्यक आहे. सध्या असलेले पिंजरे अपुरे असून, अधिक पिंजरे बसविल्याशिवाय बिबट्या पकडला जाणार नाही.

या प्रश्नावर संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, पिंजरे शिल्लक नाहीत असे उत्तर मिळाल्याचे पाचारणे यांनी स्पष्ट केले. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये वन विभागाच्या तयारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीच्या कारवाईची गरज असल्याचे म्हंटले आहे.

बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करुन, नागरिकांमधील भीती कमी करावी. शेतांमध्ये आणि वस्ती परिसरात निगराणी व गस्त वाढवावी, आवश्यकतेनुसार बाहेरील विभागांमधून पिंजरे उपलब्ध करण्याची मागणी पाचारणे यांनी केली आहे.

# सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या चेअरमन पदी अभय पितळे तर व्हाईस चेअरमनपदी शैलेश गांधी यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

अहिल्यानगर । प्रतिनिधी

सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी अभय अनिल पितळे तर व्हाईस चेअरमनपदी शैलेश पोपटलाल गांधी यांची एकमताने निवड झाली आहे. सहकारी संस्था सहाय्यक निबंधक गणेश औटी व गौतम देवळालीकर यांच्या उपस्थितीत झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड करण्यात आली.चेअरमनपदासाठी अभय पितळे यांच्या नावाची सूचना संचालक विनित बोरा यांनी मांडली, त्यास संचालक संतोष गांधी यांनी अनुमोदन दिले. व्हा.चेअरमनपदासाठी शैलेश गांधी यांच्या नावाची सूचना संचालक चेतन भंडारी यांनी मांडली त्यास संचालिका सुवर्णा डागा यांनी अनुमोदन दिले.






यावेळी संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, समीर बोरा, चेतन भंडारी, विनित बोरा, ड.आनंद फिरोदिया, शरद गोयल, सौ.सुवर्णा डागा, सौ. प्रिती बोगावत, तज्ज्ञ ज्येष्ठ संचालक शांतीलाल गुगळे, सी.ए. परेश बोरा, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी यांच्यासह सभासद सी.ए. अशोक पितळे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अशोक गांधी, मर्चंटस बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा, ज्येष्ठ सभासद राजेंद्र चोपडा, मर्चंटस बँकेचे संचालक विजय कोथिंबीरे, किशोर गांधी किरण शिंगी किशोर श्रीश्रीमाळ, प्रमोद डागा, प्रतिक बोगावत, निलेश मेहेर, संतोष पितळे, प्रसन्न खाजगीवाले, दिनेश भंडारी, संतोष बोरा, रमेश पितळे, सूर्यकांत गांधी (नेवासा), प्रकाश गांधी, विनय गुंदेचा, अशोक भंडारी, सी.ए. अजय गांधी, अजित मुथा, अभय गुगळे (नेवासा), अनिल लोढा (सोनगाव), नितीन कटारिया यांच्यासह मार्केट यार्ड, नवी पेठ, नेवासा येथील सभासद, व्यापारी उपस्थित होते.

निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सहकारी संस्था सहाय्यक निबंधक गणेश औटी यांचा सत्कार माजी चेअरमन समीर बोरा यांनी केला. प्रारंभी संस्थेचे दिवंगत संचालक विनय भांड यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नूतन चेअरमन अभय पितळे म्हणाले की, सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी अतिशय दूरदृष्टीने स्थापन केलेल्या पतसंस्थेच्या चेअरमनपदाची संधी मिळणे हा माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. याआधी संस्थेत व्हाईस चेअरमन म्हणून योगदान दिले. संस्था रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना सहकारी संचालकांनी विश्वास दाखवत चेअरमनपदी निवड केली याचा अतिशय आनंद आहे. पतसंस्था उत्कृष्ट आर्थिक कामगिरी, अत्याधुनिक बँकिंग सुविधा, सभासद, ग्राहक हितासाठी नावाजली जाते. एनपीए आणखी कमी करताना सभासदांना १५ टक्के लाभांशाची परंपरा कायम राखण्याचा मानस आहे. सोने खरेदीसाठी कर्ज ही अभिनव योजना अतिशय लोकप्रिय झाली आहे याचे समाधान वाटते. सभासद हितासाठी सर्व सहकारी संचालकांना सोबत घेऊन संस्थेचा नावलौकिक आणखी वृध्दींगत होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. शेवटी नूतन व्हाईस चेअरमन शैलेश गांधी यांनी आभार मानले.

# भारत नव्हे, हा आहे जगातील सर्वात सुरक्षित देश



दैनिक वादळ वार्ता

आईसलँड हा जगातील सर्वात सुरक्षित देश आहे, कारण आईसलँडचा गुन्हेगारी दर, विशेषतः हिंसक गुन्ह्यांचा दर, जगातील इतर देशांच्या तुलनेत नगण्य आहे. दरवर्षी येथे १ ते ९ किंवा शून्य लोकांचा खून होतो. आईसलँडच्या पोलीसांना दैनंदिन कर्तव्यावर असताना शस्त्रे बाळगण्याची परवानगी नसते. यामुळे नागरिकांमध्ये आणि पोलिसांमध्ये शांतता आणि विश्वास टिकून राहतो. या देशात सामाजिक आणि आर्थिक समानता खूप जास्त आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील मोठी दरी येथे नसल्यामुळे, गुन्हेगारीला कारणीभूत ठरणारे द्वेष आणि नैराश्य कमी असते. त्यामुळे नागरिक सुरक्षित आहेत. आईसलँडमध्ये आरोग्य सेवा, शिक्षण आणि बेरोजगारीचे लाभ यांसारख्या क्षेत्रांमध्ये सरकारी मदत उपलब्ध आहे. यामुळे लोकांना जगण्यासाठी अवैध मार्गांचा अवलंब करण्याची गरज पडत नाही. आईसलँडची एकूण लोकसंख्या सुमारे ३.७ लाख आहे. लोकसंख्या कमी असल्यामुळे, लोकांचा एकमेकाशी जवळचा आणि व्यक्तिगत संबंध असतो. प्रत्येकजण एकमेकांना ओळखतो, ज्यामुळे क्राइम रेट कमी आहे, त्यामुळे सर्व लोक सुरक्षित आहेत.

# सुनीता मरसकोल्हे यांच्या ‘बेकायदेशीर’ अटकेविरोधात विकास अधिकाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरूच

पालघर । दैनिक वादळ वार्ता

पंचायत समिती आर्वी (जि. वर्धा) येथील गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांना मनरेगा मधील कथित अपहार प्रकरणात कायदेशीर प्रक्रिया न पाळता अटक करण्यात आल्याने महाराष्ट्र विकास सेवा संघटनेसह राज्यातील अधिकारी वर्गामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या अटकेचा निषेधार्थ पालघर जिल्हा परिषदेतील विकास अधिकाऱ्यांनी ४ आणि ५ डिसेंबर रोजी सामूहिक रजेद्वारे कामकाज बंद ठेवले होते. तथापि, शासनाकडून कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने अधिकारी वर्ग आता अधिक आक्रमक झाला असून आज ८ डिसेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे,प्रकल्प संचालिका डॉ.रूपाली सातपुते,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) इजाज अहमद शरीकमसलत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) अशोक पाटील,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) अतुल पारसकर सर्व गटविकास अधिकारी,सहायक गटविकास अधिकारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

अधिकारी वर्गाचे म्हणणे आहे की मरसकोल्हे यांच्यावरील कारवाई न्यायालयीन आणि प्रशासकीय प्रक्रियेला धरून नाही. मनरेगा योजनांमधील डेटा एन्ट्रीपासून एनपीसीआय मॅपिंगपर्यंतची तांत्रिक कामे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून केली जातात, तर डीएसी ही गटविकास अधिकाऱ्यांची केवळ अंतिम तांत्रिक प्रक्रिया असते. या प्रक्रियेच्या आधारावरच अधिकाऱ्याला गुन्हेगार ठरवणे हा स्पष्ट अन्याय आणि अधिकारी वर्गाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न आहे,असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.या लढ्यात ग्रामसेवक संघटना, विस्तार अधिकारी संघटना आणि



लिपिक संवर्गीय संघटना यांनीही खुले समर्थन दिल्याने आंदोलनाचा विस्तार अधिक तीव्र होणार असल्याचे संकेत आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे राज्य सरचिटणीस सुचित घरत, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन चे पालघर जिल्हा अध्यक्ष सुनील अहिरे, विस्तार अधिकारी पंचायत संघटनेचे पालघर जिल्हा अध्यक्ष राजू कोळी, पालघर जिल्हा जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ सरचिटणीस

नितीन पवार यांनी अधिकाऱ्यांसोबत सदर संघटनांनी देखील आंदोलनस्थळी उपस्थित राहून मरसकोल्हे यांच्या अटकेविरोधात निषेध करून आंदोलनाला पाठिंबा दिला. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे तसेच उपस्थित सर्व अधिकारी यांनी याबाबत ठाम भूमिका मांडताना सांगितले की गटविकास अधिकाऱ्यांविरुद्ध झालेल्या कारवाईत कायद्याची मूलभूत प्रक्रिया पाळली गेली नाही. डीएससी वापर हा अंतिम तांत्रिक टप्पा आहे; त्यावरून अधिकाऱ्यांना थेट गुन्हेगार ठरवणे अन्यायकारक आहे. आम्ही शासनाकडून तटस्थ, न्याय्य आणि अधिकारी सन्मान जपणारा निर्णय अपेक्षित आहोत. ५ डिसेंबरपर्यंत मागण्यांवर तोडगा न निघाल्याने आजपासून बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आला असून, मनरेगा,पंचायत,घरकुल तसेच इतर विभागातील अनेक महत्त्वाच्या कामांवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अधिकारी वर्गाने शासनाला तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती सुरळीत करण्याचे आवाहन केले आहे.

# वनहक्कातून वनसंवर्धन: वाल्हेरी गावात ऐतिहासिक कामाची सुरुवात!

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार | दिपक गोसावी**

वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि रोजगार हमी योजनेची (मनरेगा) जोड देऊन नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील वाल्हेरी ग्रामसभेने वनसंवर्धनाच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकले आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई आणि जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत असलेल्या प्रकल्पांतर्गत वाल्हेरी येथे सामूहिक वन हक्क क्षेत्रात दगडी नाला बांध बांधण्याच्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे.

२०१८ साली वाल्हेरी ग्रामसभेला अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी अधिनियम, २००६ नुसार २७४.८२ हेक्टर क्षेत्राचा सामूहिक वन हक्क प्राप्त झाला होता. वनहक्क कायद्याच्या कलम ३(१) नुसार, या क्षेत्राचे संरक्षण, संवर्धन, पुनरुज्जीवन आणि व्यवस्थापनकरण्याची पूर्ण जबाबदारी ग्रामसभेवर आहे. सामूहिक वन हक्क क्षेत्राचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामसभेने शिवार फेरी करून सीमांकण, जैवविविधता नोंद, संरक्षण नियमावली आणि कामाचा आढावा घेतला. या आधारावर ५ वर्षांचा सामूहिक वन संसाधन व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी आराखड्यास तालुका आणि जिल्हा कन्वर्जन्स समितीची मान्यता मिळाली आहे. या आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामसभेने वनहक्क कायद्याला मनरेगाची जोड दिली आहे. यातूनच दगडी नाला बांध बांधण्याच्या कामाला प्रारंभ झाला आहे. या कामामुळे सामूहिक वन हक्क क्षेत्रातील वन व जल संवर्धन होणार आहे, तसेच गावातील लोकांना गावातच निश्चित रोजगार उपलब्ध होणार आहे. नंदुरबार जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी,तळोदा प्रकल्प अधिकारी अनय नवंदर, आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतील संशोधन अधिकारी स्नेहा भानारकर, गणेश सुरपाम यांच्यासह जिल्हा प्रशासन, वन विभाग आणि ग्रामस्थांचे सक्रिय सहकार्य या ऐतिहासिक कामासाठी लाभले आहे. वाल्हेरी ग्रामसभेने वनसंवर्धनाचे जे मॉडेल उभे केले आहे, ते इतर गावांनाही प्रेरणा देणारे ठरणार आहे.



## कोल्हेवाडी येथील तुळजाई मंदिर सभामंडप बांधकामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज | प्रतिनिधी**



केज विधानसभा मतदार संघात विविध विकास कामांना गती देण्याच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. कोल्हेवाडी येथील श्री. तुळजाई मंदिर परिसरात सभामंडपाच्या बांधकामा साठी मंजूर झालेल्या कामाचा भूमिपूजन सोहळा गावात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हे काम भाजपा ज्येष्ठ नेते नंदकिशोरकाकाजी मुंदडा यांच्या सहकार्यातूनआणि केज मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या आमदार निधीतून मंजूर करण्यात आले आहे. स्थानिकांच्या दीर्घकालीन मागणीचा विचार करून हे काम तातडीने हाती घेण्यात आले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विशेष म्हणजे,नंदकिशोर काकाजी मुंदडा यांच्या निर्देशानुसार या कामाचा शुभारंभ भारतीय सैन्यात सेवेत असलेल्यागावातील दोन वीर जवान सतीश मेजर मिसाळ,ज्योतीराम मेंजर मिसाळ यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.जवानांच्या हस्ते भूमिपूजन होणे हा गावासाठी अभिमानाचा क्षण ठरला असून उपस्थित ग्रामस्थांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले.यावेळी कोल्हेवाडी गावातील मोठ्या संख्येने ग्रामस्थ,स्थानिककार्यकर्ते, बांधकाम समिती सदस्य, महिला,पुरुष भक्तगण उपस्थित होते.भूमिपूजना नंतर सभामंडपाचे काम तातडीने सुरू करण्यात आले असून आगामी काही महिन्यांत हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तुळजाई मंदिर परिसरात हा सभामंडप उभारला जाणार असल्याने सामाजिकसांस्कृतिक कार्यक्रम,धार्मिक उत्सव आणि ग्रामविकासासाठी हे ठिकाण महत्त्वाचे केंद्र ठरेल,अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. तसेच या विकासकामा बद्दल आमदार नमिताताई मुंदडा आणि काकाजी मुंदडा यांच्या नेतृत्वाची उपस्थितांनी प्रशंसा केली.

## प्रदीप गायकवाड यांची माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या केज तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जे पी ॲडव्हर्टाइजमेंट अँड मार्केटिंग बिझनेस तर्फे सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**केज | प्रतिनिधी**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या केज तालुका अध्यक्षपदी श्री.प्रदीप गायकवाड यांची निवड झाल्या निमित्त दि.९ डिसेंबर रोजी धारूर रोड,केज येथे जे पी ॲडव्हर्टाइजमेंटअँड मार्केटिंग बिझनेस कार्यालयात भव्य सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक संस्थेचे प्रोप्रायटर प्रशांत हजारे होते.त्यांनी प्रदीप गायकवाड यांचा शाल, पुष्पहार देऊन सन्मान केला.सत्कार सोहळ्यास व्यावसायिक,पत्रकार, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण प्राप्त करून दिले.यामध्ये रणजीत घाडगे,पांडुरंग कसबे यांच्यासह अनेक युवक,समाजप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





सत्कार कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जे पी ॲडव्हर्टाइजमेंट अँड मार्केटिंग बिझनेसच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.प्रदीप गायकवाड यांच्या निवडीमुळे माहिती अधिकार चळवळ केज तालुक्यात आणखी प्रभावीपणे कार्यान्वित होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## १५,००० फूटांवरून स्कायडायव्हिंगची थरारक झेप विसरवाडीच्या नरेंद्र मोरे यांचा वाढदिवस साहसी!

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार | दिपक गोसावी**

वाढदिवस साजरा करण्याची पारंपारिक पद्धत बाजूला सारत, विसरवाडी (नंदुरबार जिल्हा) येथील उत्साही तरुण नरेंद्र मोरे यांनी आपला वाढदिवस एका अविस्मरणीय आणि थरारक पद्धतीने साजरा केला आहे. त्यांनी थेट ब्राझीलमधील जगप्रसिद्ध स्कायडायव्हिंग झोनवर १५,००० फूट इतक्या प्रचंड उंचीवरून आकाशात धाडसी झेप घेतली. धैर्य, आत्मविश्वास आणि साहसाची परिसीमा गाठणारी ही कृती निश्चितच प्रेरणादायी ठरली आहे.



नरेंद्र मोरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक वेगळे आव्हान स्वीकारण्याचा निर्णय घेतला. वाढदिवसाचा हा क्षण आयुष्यभर स्मरणात राहावा यासाठी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्कायडायव्हिंग केंद्राची निवड केली. १५,००० फूट उंचीवरून खाली झेप घेतानाचा तो फ्रीफॉलचा अनुभव रोमांचक आणि अद्वितीय होता.

आकाशातून मुक्तपणे खाली झेपावतानाचे आणि हवेत तरंगतानाचे त्यांचे अविस्मरणीय क्षण व्यावसायिक कॅमेऱ्यांनी अप्रतिमरीत्या टिपले आहेत. त्यांच्या या स्कायडायव्हिंगचे फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठा प्रतिसाद मिळवत आहेत.

स्थानिक नागरिक, मित्रपरिवार आणि तरुण पिढीसाठी नरेंद्र मोरे यांची ही साहसी झेप अभिमानाची आणि प्रेरणादायी ठरली आहे. वाढदिवस म्हणजे केवळ समारंभ नाही, तर तो एका नव्या संकल्पाचा आणि धाडसाचा दिवस असू शकतो, हे त्यांनी सिद्ध केले आहे.नरेंद्र मोरे यांचा हा वाढदिवस थरार, भावना आणि अद्वितीय साहसाचा परिपूर्ण संगम ठरला आहे.

## पैशाच्या मागणीला कंटाळून तरुणाने केली आत्महत्या

**दैनिक वादळ वार्ता**
**आष्टी | प्रतिनिधी**

सासरा ,मेव्हणा ,आणि पत्नी हे वेळोवेळी पैशाची मागणी करून मानसिक त्रास देत असल्याने एका तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन जिवन संपवल्याची दुर्दैवी घटना रविवारी सकाळी घडली याप्रकरणी अंभोरा पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे सुमित (उर्फ )योगेश श्रीधर लोखंडे (वय ३४ वर्ष राहणार धामणगाव तालुका आष्टी ) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे सासरा मेव्हणा व पत्नी हे तिघे त्याला सतत पैशाची मागणी करून मानसिक त्रास देत होते हा त्रास असाह्य झाल्याने सुमित यानी रविवारी सकाळच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली या प्रकरणी मयताचे वडील श्रीधर बाबुराव लोखंडे यांचे फिर्यादी वरुन आरोपी हौसराव श्रीधर झिंजुर्के (सासरा ) नारायण हौसराव झिंजुर्के (मेहुना )आणि सीमा सुमित लोखंडे (पत्नी या तिघाविरुद्ध अंभोरा पोलीस ठाण्यात आत्महत्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.



## दिवसाढवळ्या दुकानात चोरी करणारी टोळी उघडकीस तीन लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक वादळ वार्ता**
**केज | प्रतिनिधी**

दिनांक ०८/१२/२०२५ रोजी कोहिनूर जनरल स्टोअर्स, बीड येथे इमिटेशन ज्वेलरीची चोरी झाल्याची माहिती बीड शहर पोलिसांना प्राप्त झाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार चोरीमध्ये सहभागी असलेला रिक्षा चालक दिलशान खान पिता इस्माईल खान, वय ४३ वर्ष, रा. पडेगाव, छत्रपती संभाजीनगर यास चोरीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. त्याच्याकडून अंदाजे ४०,००० रुपये किमतीची इमिटेशन ज्वेलरी तसेच अंदाजे २.५ लाख रुपये किमतीची रिक्षा असा एकूण ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपासात असे उघड झाले की मुख्य आरोपी दिलशान खान हा या टोळीचा प्रमुख असून तोच छत्रपती संभाजीनगरहून चार बुर्खाधारी महिलांना घेऊन बीड शहरात चोरी करण्यासाठी आणत असे, गर्दीच्या वेळेत खरेदीच्या बहाण्याने दुकानात प्रवेश करून चोरी करणे आणि तत्काळ रिक्षाने परत निघून जाणे हीच त्यांची निश्चित पद्धत असल्याचे तपासात समोर आले आहे. चोरीमध्ये सहभागी असलेल्या चार बुर्खाधारी महिला आणि त्यांच्यासोबत असलेल्या आणखी एका इसमाचा पोलीस शोध घेत असून त्यांना अटक करणे बाकी आहे. पुढील तपास सुरू आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. पूजा पवार आणि पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार बबन जाधव, शहेनशहा सय्यद, इलियास शेख, मंगेश शिंदे, रामेश्वर पवार आणि गहिनीनाथ बावनकर यांनी केली आहे.

## तळोदा तालुक्यात बिबट्याची दहशत!

### मोड येथे दहा दिवसांच्या पारड्यावर बिबट्याचा हल्ला; तीन बिबटे आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार | दिपक गोसावी**

दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास तळोदा तालुक्यातील मोड तालुका तळोदा येथे बिबट्याच्या हल्ल्यात एका दहा दिवसांच्या पारड्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कॉम्प्रेड बीटीआर माध्यमिक विद्यालयाच्या मागील बाजूस राहणाऱ्या भरवाड कुटुंबाच्या गुरांवर हा हल्ला झाला. या घटनेमुळे परिसरात बिबट्याची मोठी दहशत निर्माण झाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मोड तालुका तळोदा येथील रहिवासी चिंध्या म्यारा भरवाड आणि गभा चिंध्या भरवाड हे कुटुंब कॉम्प्रेड बीटीआर माध्यमिक विद्यालयाच्या मागील बाजूस राहते. त्यांनी आपल्या दोन घरांजवळील मोकळ्या मैदानात गुरे बांधली होती. या गुरांमध्ये दहा दिवसांपूर्वी जन्मलेल्या एका गोंडस पारड्याचा समावेश होता.गभा चिंध्या भरवाड यांना रात्री १० वाजेच्या सुमारास कॉम्प्रेड बीटीआर माध्यमिक विद्यालयाच्या शेजारी असलेल्या टाक्यांजवळ तीन बिबटे दिसले होते. मात्र, ते तातडीने झोपडीत निघून गेले. पहाटे ३ वाजेच्या सुमारास काहीतरी हालचाल जाणवल्याने ते उठले. बाहेर येऊन पाहतात तो बिबट्याने त्या पारड्याला ओढून नेले होते. जवळ जाऊन पाहिले असता, बिबट्याने हल्ला करून पारड्याला अर्धवट खाल्ल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच मोड येथील सरपंच सविता गावित यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांनी लागलीच वन विभागाशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. वन विभागाने घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ दखल घेतली आणि घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी बोरद येथील वनपाल अपर्णा लोहार, वनरक्षक लक्ष्मी पावरा, महेंद्र तडवी, पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर एस.एस. सोनवणे आणि सामाजिक कार्यकर्ते संजय थोरात हे उपस्थित होते. सलग दुसऱ्या दिवशी परिसरात बिबट्या दिसल्याने वन विभागाने यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.



> **सध्या परिसरामध्ये सर्वत्र ऊसतोड सुरू असून मुख्यत्वे करून बिबट्याची लपण्याची जागाच म्हणजे उसाचे शेत होते आणि ऊसतोड ही होत असल्याने बिबटे हे सैरावैरा इकडे तिकडे धावू लागलेले आहेत त्यांना लपण्याचे साधन उपलब्ध नाही अशा वेळेस ते कपाशीच्या शेतात नजीकच्या केळीच्या शेतात लपून असतात त्यामुळे गावकऱ्यांनी उघड्यावर आपली जनावर न बांधता गोठ्यांचा आधार घ्यावा किंवा उघड्यावर जनावरं बांधताना कुंपण घालावे. जेणेकरून जनावरांची सुरक्षा करता येईल आणि नागरिकांनी देखील सतर्क रहावे.**
> **अपर्णा लोहार, वनपाल बोरद तालुका तळोदा.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077